# लीलावती रुग्णालयाकडून मूत्रपिंडाच्या आरोग्याविषयी जनजागृती कार्यक्रम

**मुंबई :** लीलावती रुग्णालय अँड रिसर्च सेंटरतर्फे मूत्रपिंडाच्या आरोग्याविषयी जनजागृतीसाठी विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला. 'आर युअर किडनी ओके?' या संकल्पनेवर आधारित या उपक्रमात संवाद सत्र, गुण प्रदर्शन, प्रश्नमंजुषा स्पर्धा आणि पुरस्कार वितरण यांचा समावेश होता. या कार्यक्रमाला राजीव मेहता, डॉ. हेमंत मेहता, डॉ. निरज उत्तमणी आदी मान्यवरांची उपस्थिती होती. मूत्रपिंडाचे आजार वेळेवर ओळखले गेले नाहीत, तर त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात, असे नेफ्रोलॉजिस्ट डॉ. हेमंत मेहता यांनी सांगितले. मधुमेह, रक्तदाब आणि चुकीची जीवनशैली हे प्रमुख कारणीभूत घटक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.